कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/हिंसंवि/२०२३-२४/१४६०
दि. ०९ /१०/२३

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या भारतीय संगीत व नृत्य विभागात विविध अभ्यासक्रमासाठी कलेची ओढ असलेल्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशअर्ज मागविण्यात येत आहेत. सदर प्रवेशअर्ज २०२४ च्या शैक्षणिक वर्षासाठी असतील.

या अभ्यासक्रमात भारतीय संगीतांतर्गत शास्त्रीय गायन, हार्मोनियमवादन तसेच तबलावादन, भरतनाट्यम व कथ्थक नृत्य इत्यादि प्रकारांचे विशेष प्रशिक्षण दिले जाईल. या सर्व अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी वयोमर्यादा किमान १० वर्षे अशी राहील. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत वयाची १० वर्षे पूर्ण केलेल्यांनीच सदर अभ्यासक्रमांसाठी अर्ज करावेत. कमाल वय ३५ राहील.

इच्छुकांना प्रवेशासाठीचा अर्ज व माहीतीपत्रक दि. १६ ऑक्टोंबर ते २० नोव्हेंबर २०२३ या कालावधीत सकाळी १०.०० ते १.०० व दुपारी २.०० ते ४.०० वाजेपर्यंत कला अकादमीच्या लेखा विभागातून (Cash Counter) मिळवता येईल. इच्छुकांनी आपले पूर्ण भरलेले अर्ज दि. २० नोव्हेंबर २०२३ संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत जन्मदाखल्यासह जुने सचिवालय पणजी, लेखा संचालनायाच्या समोर, पणजी, गोवा या पत्यावर समक्ष सादर करावे. अंतिम मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

वरील विषयासाठी निवडचाचणी खालील प्रमाणे घेण्यात येईल दि. २७ नोव्हेंबर २०२३ (दुपारी २.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत) व दि. २८ नोव्हेंबर २०२३ तबला, शास्त्रीय गायन, हार्मोनियम तसेच भरतनाट्यम व कथ्थक नृत्य. (सकाळी १०.०० ते दुपारी १.००) आणि (दुपारी २.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत) कला अकादमीचा हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग हा गव्हर्मेन्ट पॉलिटेक्निक क्वाटर्स्, आल्तीनो, पणजी येथे स्थलांतरीत करण्यात आला असून क्वाटर्स् नं., डी-२-१ व डी-२-२ (भरतनाट्यम व कथ्थक), क्वाटर्स् नं., डी-३-१ व डी-३-३ (शास्त्रीय गायन, हार्मोनियम व तबला) येथे हे वर्ग सुरु करण्यात आले असून सदर निवड चाचणी वरील ठिकाणी होणार आहे यांची सर्वांनी नोंद घ्यावी.
तसेच कला अकादमीच्या पेडणे, वाळपई, साखळी, काणकोण, केपे व सांगे येथील संगीत केंद्रात शास्त्रीय गायन, तबला व हार्मोनियम वादनाचे प्रशिक्षण दिले जाते. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी तेथील केंद्र प्रमुखांशी दि. २० नोव्हेंबर ते १५ डिसेंबर २०२३ या कालावधीत संपर्क साधावा. सविस्तर माहितीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी खालील केंद्र प्रमुखांशी संर्पक साधावा.

| केंद्र | केंद्र प्रमुख | मोबाईल |
|---|---|---|
| १. पेडणे | श्री.राजू बर्वे | ९१४५०४२२८३ |
| २. साखळी | सौ. प्रचला आमोणकर | ७५०७७४१८१५ |
| ३. वाळपई | श्री.नारायण मेस्त | ९४०५९८६०८१ |
| ४. केपे | श्री.अमित भोसले | ७०८३२२९९५६ |
| ५. सांगे | कु.समृध्दि थळी | ९३५९१३२९९० |
| ६. काणकोण | सौ.नितु महाले | ९०७५०८८२२८ |

(श्री. विनेश आर्लेकर)
सदस्य सचिव
कला अकादमी गोवा

प्रति,
प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)